Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648

Indexed (IIJIF)

Impact Factor - 2.143

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

## Special Issue

Issue I, Vol I 10th February 2018

Editor in Chief

Mr.Arun B. Godam

www.rjournals.co.in

## English


| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Globalization and Bharti Mukhrjee's Select Novels | Dr.Milind Mane | 183 |
| 2 | New Avenues of Sexology and Pornographic Literature in Globalization | Dr. Navle Balaji Anandrao, Prof. Manik Bhatane | 187 |
| 3 | English Language and Globalization | Dr. Manisha Vinayak Bhise | 192 |
| 4 | Globalization and Literature | Dr. Bandal V. S. | 194 |
| 5 | Globalisation and Literature | Dr. Ahilya Bharatrao Barure | 196 |
| 6 | Global India in Chetan Bhagat's *One Night @ the Call Centre* | Dr. Kittekar Utkarsh Bhikajirao | 198 |
| 7 | Globalization and Literature : An Overview | Prof. Maniyar A.R. | 201 |
| 8 | Impact of Globalization on Indian Women | Mr. Rathod Umesh Khushal | 202 |
| 9 | Media and literature in Globalization Era. | Dr. Yuvaraj S. Kathale | 207 |
| 10 | Social Criticism and Global Scenario in The Writing of Mahasweta Devi | Swarupa Vyawahare Balaji Navle | 208 |
| 11 | The Volatile Cosmos of Media & Enlighten | Uday Madhukarrao Kharat | 211 |
| 12 | The Melieu of Indian Social Aspects in the selected Novels of Girish Karnad | Asst. Prof. Kadam Sachin Sambhaji | 213 |
| 13 | जागतिकीकरण आणि साहित्य | प्रा.डॉ. मनोहर सिरसाट प्रा. आनंदराव जाधव | 216 |

ISSN : 2319 – 8648 CURRENT GLOBAL REVIEWER
Impact Factor : 2.143 SPECIAL ISSUE Issue I, Vol I, 10th Feb. 2018

# जागतिकीकरण आणि साहित्य

प्रा.डॉ. मनोहर सिरसाट
मार्गदर्शक, कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, धारुर जिल्हा.बिड
प्रा. आनंदराव जाधव
संशोधक, नवभारत ज्युनियर कॉलेज, टेंभूर्णी

--------------(13)--------------

साहित्य आणि समाज ह्या एकाच नाण्याचा दोन बाजू आहेत किंवा साहित्य हा समाजाचा आरसा असतो असे आपण नेहमी ऐकतो परिणामी समाजात जेजे परिवर्तन किंवा स्थित्यंतरे घडुन येतात त्या सर्व बदलांचा परिणाम समाजावर पर्यायी साहित्यात दिसून येतो युद्ध भूकंप यासारखे आस्मानी सुलतानीचाही परिणाम साहित्यीक हे आपल्या साहित्यातून टिपण्याचा प्रयत्न करतात १९६० नंतर साहित्यामध्ये ग्रामीण साहित्य, दलीत साहित्य स्त्रीवादी साहित्याने जोर धरला परंतू हा जोर किंवा या कालावधीतील विषय १९९० नंतर पूर्णतः बदलले १९९१ नंतर भारतात खऱ्या अर्थाने जागतिकीकरणास सुरुवात झाली ती म्हणजे भारताने डंकेल प्रस्तावावर स्वाक्षरी केलीआणि जागतिकीकरणाच्या लाटेमध्ये स्वतः झोकूण घेतले जागतिकीकरणाच्या ही वरकरणी जरी आर्थिक क्षेत्राशी निगडीत संकल्पना वाटत असली तरी अर्थाशिवाय अर्थ नाही किंवा अर्थाविना अनर्थ या विचारधारेनूसार जागतिकीकरण म्हणजे संपूर्ण जागाची एकच बाजारपेठ एवढाच सिमीत अर्थ या संकल्पनेचा अपेक्षित होता पण खजगीकरण उदारीकरण आणि जागतिकीकरण ( खाऊजा धोरण ) या धोरणाने संपूर्ण समाज ढवळून निघाला.

जागतिकीकरण म्हणजे काय या विषयी जागतिकीकरणाच्या स्वरुपा विषयी रंगनाथ पठारे यांच्या मते,मुळात एका व्यापारी उदेशाने सूरु झालेली व आता जगड्.व्याळ स्वरुप धारण केलेली हि प्रक्रीया सर्वसाक्षी, सर्वभक्षी, सर्वस्वव्यावणारी अशी झालेली आहे. जगण्याच्या आर्थिक समाजिक, राजकीय व्यवहारांना एका सुत्रात ओवणे ही तिची अंतिम आकांक्षा असणार, किंबहूना आहे. कारण ते सगळयात सुलभ आणि सोयीस्कर ह्यावरुन जागतिकीकरण ही काही सहज सुलभ प्रक्रिया नसून ती अतिशय गुंतागुतीची अशी संकल्पना आहे. १९९० नंतर जागतिकरणाच्या प्रक्रियेने वेग घेतला गॅट करारावर सही करणे हे भारतीयासाठी योग्य की अयोग्य यावर अनेक मतमतांतरे आढळून येतात. जागतिकीकरणाच्या संकल्पना व स्वरुपाविषयी अनेक मतभेद आढळून येतात जागतिकोकरणाच्या स्वरुप हे इतके व्यापक आहे की, मधुकर मोकाशी यांच्या मते, माणसाच्या पायाखाली असणाऱ्या मातीपासून ते मातीतून उगवणाऱ्या मनापर्यंत अनेक बाबतीत जागतिकीकरणाचे परिणाम होत आहेत

जागतिकीकरणाचा साहित्यावर झालेला परिणाम अभ्यासण्यापूर्वी जागतिकीकरणाचा भारतिय समाजावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करण्यापूर्वी पूढे जाणे सोयीची ठरणार नाही. कारण समाज हीच साहित्याची जननी असते . म्हणुन अगोदर जागतीकीकरणाचा भारतीय समाजावर झालेल्या प्रभावाचा अभ्यास गरजेचा ठरतो.

**भारतात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा प्रारंभ :-**

डॉ. रविंद्र शोभणे यांच्या मते, जागतिकी करणाच्या या प्रक्रियेला प्रारंभ होतो तो स्व.राजीव गांधी यांच्या काळापासून त्यापूर्वी स्व. इंदिरा गांधीच्या काळात भारतात दूरदर्शन आले. आणि सर्वसामान्य माणसाला घरबसल्या. बाहेरच्या जगाची ओळख दृश्यरुपात होऊ लागली. कृष्णधवल दूरदर्शन संच रंगीत स्वरुपात अवतरला, टॉवरची उंची आणि क्षमता वाढायला लागली. तसतसे दूरदर्शन घराघरात पोहोचले. येथूनच जागतिकीकरणाचा पहिला अध्याय सुरु झाला, असे म्हणावयास हरकत नाही. म्हणजेच जागतिकीरणाची प्रक्रीया भारतात रुजली किंवा या प्रक्रियेचा प्रारंभ झाला त्याला चार शतके.उलटून गेली व या प्रक्रियेचे मूर्तरुप हे मात्र एकविसाव्या शतकाच्या प्रारंभी दिसू लागले कारण स्व. इंदिरा गांधीच्या काळात दूरदर्शनच्या इतिपासून सुरु झालेला हा जागतिकीकरणाचा गाडा पूढे राजीव गांधीच्या काळात अधिक गतीमान झाला या काळात संगणक अवतरला आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला खरे स्वरुप प्राप्त झाले.

यावरुन जागतिकीकरणाची बीजे आपल्या समाजात फार पूर्वीपासून रुजू लागली असल्याचे दीसून येते.

**जागतिकीकरणाचा भारतिय समाजावर झालेला प्रभाव :-**

१९७५ हे वर्ष भारतिय लोकशाहीच्या इतिहासातील एक निर्णायक वर्ष ठरले ते त्यावर्षी घोषीत झालेल्या आणि आणीबाणीमूळे. यानंतर अवघ्या दोन दशकाचा कालावधी ओलांडताच अर्थव्यवस्थेला राजकारणाने नियंत्रित करण्याएवजी राजकारणालाच अर्थव्यवस्थेने नियंत्रित करण्याचा अमेरिकेने पाया घातलेल्या नव्या युगात भारतानेही प्रवेश केला याविषयी नागनाथ कोत्तापल्ले यांच्या मते, १९९० मध्ये

आपला देश जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये सहभागी झाला. अर्थात तो फार आनंदाने यापक्रीयत समाविष्ट झाला असेल असे नाही. त्यापूर्वीची एकूण देशाचो आर्थिक परिस्थिती निश्चितच चितां करण्यासारखी होती` एक प्रकारे नाईलाज म्हणून का होईना जागतिकिरणाच्या प्रक्रियेत आपल्याला सहभागी व्हावे लागले जागतिकिकरणाची प्रक्रिया जीवनाच्या सर्वच क्षेत्रात पोहचल्याने तिला रोखणे अशक्य होते आणि म्हणूनच भारताला सुधा या प्रक्रियेत सहभागी व्हावे लागले. जागतिकीकरणाचा प्रभाव मांडणाऱ्या प्रमूख कथाकारामध्ये वासूदेव मूलाटे यांच्या काळोखवेण रा. र बोराडे यांचा मारा उत्तम बावस्कर यांचा विस्कोट श्री राम गुदेकर यांची अचल तर अलिकडच्या काळात जागतिकिकरणाचा प्रभाव साहित्यातून प्रकट करणारे नव्या दमाचे लेखक म्हणुन सदानंद देशमुख यांचे लचांड आणि महालूट हे कथासंग्रहा मैलाचे दगड ठरले आहेत तर भास्करचंदन शिव यांचा अंमवती हा कथासंग्रह जागमिकीकरणाचे स्वरुप दाखविणारा दिपस्तभ ठरते तर जयंत पवाराचा फिनिक्सच्या राखेतून हा कथासंग्रह जागतिकीकरणाचे याचे वास्तव दाखवणारा जागतीकीकरणाचे बोलके चित्रण करते एकंवरीत जागतिकीकरणा नंतर रागाजामध्ये ज्याकथा रचल्या गेल्या त्याचा आधार जागतिकीकरण हाच होता.

**जागतिकीकरणाचे भारतीय समाजावरील पडसाद :-**

जागतिकोकरण हो एक जटील प्रक्रीया आहे हे आपणास दिसते किंवा जागतिकोकरण हे काही फक्त भारतासाठीच होते किंवा आहे. असे नसून संपूर्ण जगासाठीची ती एक प्रक्रिया ठरली आहे. जागतिकीकरणाने भारतीय समाजविश्व व्यापले आहे त्यामूळे कोणत्याही गोष्टीचे चांगले वाईट असे दुर्गामी परिणाम असतात. जागतिकीकरणाकडे सुद्धा काही विचारवंत भारतिय समाजावर इष्ट परिणाम झाला असे मत मांडतात तर काहिंच्या मते जागतिकीकरणाचा भारतिय समाजावर अनिष्ट परिणाम झाल्याचे नोंदवतात. खऱ्या अर्थाने इष्ट अनिष्टांच्या परिसंवादात किंवा चर्चेत न पडता जागतिकीकरणाचे दाहक वास्तव भारतीय समाजाला स्विकारण्याशीवाय गत्यंतर नाही हे मात्र नक्कीच. जागतिकीकरणाचा भारतीय समाजावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करत असतांना ता आर्थिक , सामाजिक , भाषिक, धार्मिक, राजकीय, अशा विविध अंगांनी करणे अचित ठरले.

**जागतिकीकरणाचे सामाजिक पडसाद :-**

१) भारताची शैक्षणिक प्रगती झाली.
२) भारतरत शहरीकरण मोठया प्रमाणत वाढले.
३) पर्यावरणाचा मोठया प्रमाणात ऱ्हास झाला.
४) दहशतवादासारखी समस्या निर्माण झाली.
५) विविध शोध जरी लागले तरी मानवी आरोग्याच्या समस्या उभ्या ठाकल्या.

**जागतिकीरणाचे भारतीय समाजावरील आर्थिक परिणाम :-**

१) देशाची आर्थिक परिस्थीती सुधारली हे वास्तव की अवास्तव हा प्रश्न पुढे येतो.
२) माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात नेत्रदिपक प्रगती झाली.
३) लघुउदयोगाची भरभराट झाली.
४) समाजात आर्थिक दरी निर्माण झाली वाढली.

**जागतिकीकरणाचे राजकीय परिणाम :-**

१) भारताकडे तिसऱ्या जगाचे नेतृत्व
२) भारताचे राजकीय वर्चस्व वाढले
३) राजकारण तत्वहीन बनले.
४) भारताची सांस्कृतीकता ढासळत असल्याची दिसते.

**जागतिकीकरणामुळे भारतीय समाजात दोन वर्ग निर्माण झाले:-**

जागतिकीकरणाचा सर्वात मोठा प्रभाव झाला तो भारतीय समाजावर तो म्हणजे भारतीय समाजाचा अभ्यास करताना एक गोष्ट आवर्जुंन लक्षात येते ती म्हणजे जागतिकीरणाच्या परिणामा विषयी प्रा.डॉ. गोपाल गुरु म्हणतात. जागतिकीकरणाच्या काळात व संगणकाच्या काळात व्यक्तीची ओळख त्याच्याकडे किंवा तिच्याकडे प्लास्टिक कार्डस् (credits cards) आहे. यावरुन ठरते आज

जागतिकीकरणात या प्लास्टिक कार्डमुळे चलन कुठेही व केंव्हाही उपलब्ध होऊ शकते. परतु जागतिकीकरणामध्ये प्लास्टिक कार्डही सार्वत्रिक सुविधा होऊ शकत नाही. कारण काही विशिष्ट वर्गाकडेच प्लास्टिक कार्ड असु शकतात. जागतिकीरणाचे समाजातील हेच दाहक वास्तव असल्याचे वरील विचारातुन दिसते. जागतिकीरणाचा समाजावरील झालेला वरील प्रभाव अभ्यासल्या शिवाय जागतिकीकरण आणि साहित्य याचा अभ्यास करणे केवळ वरपांगी-ठरेल म्हणुन वरील विषय अभ्यासणे साहित्याच्या अभ्यासापुर्वी नित्यात गरजेचे ठरते.

**जागतिकीकरण आणि साहित्य :-**

**१) पाश्चिमात्य साहित्याच्या प्रभावाचा इतिहास:-**

समाजाच्या इत्यंभूत बदलाचा परिणाम हा साहित्यावर होत असतो. कारण साहित्य हे सामाजाचे एक अंग असते. हया तंत्वानुसार जागतिकीकरणाने संपूर्ण समाज न्हावून निघाला. या प्रभावापासून साहित्य हे कसे अल्पित राहू शकेल ? भाचंलद्र नेमाडे यांच्या मते खरे तर साहित्य आणि जागतिकीकरण हया परस्पर गोष्टी आहे. असे म्हणता येईल. अगदी अलीकडे वसाहत वाद सुरु झाल्यावर साहित्यावर अंतरराष्ट्रीय दर्जा मिळवण्याचे प्रयत्न हेतूपूर्वक सुरु झाले पूर्वीही पंचतंत्र रामायण , महाभारत , हे निर्मिति स्थळाच्या बाहेर देशोदेशी पसरले, पण त्यामागे आतरराष्ट्रीयतेचे तत्व नसे चॉसर किंवा शेक्सपिअर हे हिंदुस्थानी गोष्टी कुठूनतरी हिन्दुस्थानातून केव्हांतरी युरोपात भाषांतरीत होत गेल्या त्या आपल्याशा करुन बिनदिकक्त स्वतःच्या पूस्तकामध्ये वापरत असत. थोडक्यात परकियानी लीहलेल आपल्यावर लादले गेले पण इग्रजी महणजे जगप्रसिध्द हे ही मुल्य लादले गेले आणि खऱ्या आर्थाने भारतीय साहित्यावर इंग्रजी किंवा पाश्चिमात्य साहित्याच्या अशा प्रभावास सुरुवात झाल्याचे दिसते.कारण जिथे जिथे युरोपीय देशांच्या वसाहती होत्या. त्या त्या देशातील समाज, धर्म, संस्कृती भाषा व साहित्य याचा अभ्यास करणारा एक विशष्ट वर्ग या युरोपीय राष्ट्रात अस्तिवात होता.जागतिकीकरणाच्या स्वीकारा नंतर तर हा प्रभाव येवडा वाढला की मराठी भाषेच्या आणि साहित्याच्या सदय:स्थितीशी आणि भव्यतव्याशी कोणता संभद आहे. तसेच या प्रक्रियेचा मराठी भाषेवर व साहित्यावर काहि परिणाम झाला आहे का ? साहित्यावर काहि इष्टि अनिष्ट परिणाम पडला आहे का ? असे आनेक आभ्यासपुर्ण प्रश्न उपस्थित होत आहे. ते वास्तव आहे.

प्रा. नागनाथ कोतापल्ले यांच्या मते साहित्या आणि सर्वच कला या एखादया होकायंत्रा सारखे काम करतात जीवनातील बऱ्या वाईटाच्या परिणामाचा पहिला अविश्कार जर कोठे पाहव्यास मिळत असेल तर तो साहित्या मध्येच. ११९० नंतर जागतिकीकरणामुळे भारतीय साहित्यावर सुद्धा प्रभाव पडलेला दिसतो.

**जागतिकीकरणाचा मराठी साहित्यातील पहिला तडाखा बसला तो भाषेला:-**

जागतिकीकरणात सपूर्ण विश्वाचीच एक भाषा असावी, असा सुप्त हेतू यामागे जागतिकीकरण लादणाऱ्यांचा होता. जागतिकीकरणाची भाषा म्हणून इंग्रजीला मान्यता दीली गेली आहे. त्यामुळे इंग्रजीचा मराठी साहित्यातील वापर इतका वाढला की आज मराठी मध्ये इंग्रजी शब्दाला पर्यायच उरला नाही.

**जागतिकीकरण आणि कांदबरी :-**

१९९१ नंतरच्या काळात ग्रामीण भागात विकासाच्या नावाखाली अतिशय गतिमान पध्दतीने स्थित्यंतरे होऊ लागली. राजकीय आर्थिक व शैक्षणिक स्वरुपाचे बदल जाणवू लागले या बदलांचा परिणाम गावाच गावपण हरवण्यात, ग्रामीण माणसाच्या जीवन शैलीत झाला या बदलत्या जीवनाचे म्हणजेच जागतिकीकरणाचे ग्रामीण साहित्य उमटलेले पडसाद नागनाथ कोत्तापल्ल यांच्या गांधारीचे डोळे या कादंबरी मध्ये उमटलेले दिसतात तर शंकर सखाराम यांच्या सेझ या कांदबरीत सेझच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या सूपीक जमिनी जाऊन शेतकऱ्यांना आलेले बकालपण आणि त्यांच्या जीवनाची झालेली ससेहोलपट शंकर सखाराम यांनी मोठया ताकदीने रेखाटली आहे तर बाबाराव मूसळे यांनी मोटेच्या ऐवजी आलेल्या मोटारीमूळे ओस पडलेली शेती व पाण्याला वीज डसली व पाणी पळाले त्यामूळे निर्माण झालेली पाणी समस्या पांगीराच्या माध्यमातून विश्वास पाटील यांनी जागतिकीकरणाचा ग्रामीण जीवनातील प्रभाव,परिवर्तन पांगीराच्या माध्यमातून उभे केले आहे तर नव्या दमाचे लेखक म्हणून परिचीत असणारे संदानंद देशमूख यांनी जागतिकीकरणा मूळे शेतकऱ्याच्या जीवनाची बारोमास झालेली पडझड बारोमासच्या माध्यमातून शब्दबध्द केली आहे. अलीकडेच प्रकाशित झालेली महेश निकम यांची ...त ही कांदेवरी तर जागतिकीकरणाचे दाहक वास्तव चित्रित करते व या जागतिकीकरणामध्ये माणसाचा कसा भोत झाला आहे हे

दाखवीते .१९८९ व नंतरच्या कादंबरीत आधुनिकीकरणामुळे खेडे उध्वस्त होऊ लागली व शहरे वाढु लागली असल्याचे चित्र जरी दिसत असले तरी हा बदल प्रगतीपेक्षा अधोगतीचा जास्त सूचित करणारा असल्याचे दिसून येते.

**जागतिकीकरणाच्या मराठी कवितेवरील परिणाम :-**

प्रामख्याने ९० च्या दशकापासूनच कवितेतील या बदलांना प्रारंभ झाला आहे. त्यामुळे ही कविता नव्वदोत्तरी कविता म्हणूनही संबोधली जाऊ लागली आहे ही संकल्पना जशी विशिष्ट कालदर्शक अर्थाने विचारात घ्यावी लागते तशीच ती विशिष्ट मूल्यदर्शक अर्थानेही विचारात घ्यावी लागते. आधुनिक महाराष्ट्राच्या सांस्कृतीक व वाड्.मयीन जीवनावर दूरगामी परिणाम करणारा कालखंड म्हणूनही ६० च्या दशकाइतकेच ९० चे दशकही महत्वाचे ठरलेले दिसून येते जागतिकीकरणाच्या अनुषंगाने येणारी सत्ताकांक्षा, त्याराठी करावे लागणारे विधीनिषेधशून्य नःनैतिक राजकारण, त्यातून उद्‌भवू शकणारे अराजक, बोकावू शकणारा मूलतत्त्ववाद, भाषा संस्कृतीसह एकूणच क्षेत्रीय अस्तित्वाची अनिश्चितता हे सगळेच जागतिकीकरणाचे साइडफेक्ट म्हणून स्विकारलेले दिसते ह्या सोबतच नव्वदोत्तर काळातील मूल्य संवेदन त्याचे सामान्य माणसाच्या दैनंदिन सामाजिक व सांस्कृतीक जगण्यावर होणारे बरे वाईट परिणाम अस्थेवाईकपणे समजून घेऊन याच कविंनी आपल्या कवितेतून सर्वप्रथम मांडलेले दिसून येते. तसेच या आधीच्या पिढीमध्ये क्वचितच जाणवणारे राजकीय भान हे यातील अनेक कविमध्ये जाणवले आहे हे भान जागतिकीकरणाच्या सांस्कृतीक परिणामामुळे सर्वसामान्यांच्या बदलत चालेलेल्या जीवनशैलीच्या डोळस निरिक्षणातून आलेले असू शकते.अशी विशिष्ट राजकीय भूमिका असल्यामुळेच या पिढीचे कवी नव्वदोत्तर दशकात हातपाय पसरलेल्या जागतिकीकरणाचा सामान्य माणसांच्या जगण्यावर होणाऱ्या बऱ्यावाईट परिणामांकडे मानवतावादी दृष्टिकोनातून पाहू शकत आहेत. असे म्हणता येईल.

**समारोप :-**

जागतिकीकरणा ने साहित्याच्या क्षेत्रात एक वेगळीच खळबळ निर्माण केली साहित्यातील प्रत्येक प्रवाहाला याची नोंद घ्यावी लागली त्यात कथा, कविता कादंबरी च्या माध्यमातून जागतिकीकरणाचे इष्ट अनिष्ट रुप मांडले गेले तर याच जागतिकीकरणाला आपल्या कथा कादंबऱ्याचा माध्यमातून योग्य आयोग्य पद्धतीने नोदवण्याचा प्रयत्न काही साहित्यीकांनी केला ग्रामीण साहित्याने मोठ्या प्रमाणावर जागतिकीकरण हे एक अरिष्टच आहे असाच सूर काढला तर दलित साहित्याने सुदधा हाच सूर आळवला.

तर स्त्रीवादी साहित्यामध्ये जागतिकीकरणा मूळे स्त्रीयांच्या जीवनात थोडेफार परिवर्तन आले असले तरी स्त्रीला उपभोग्य वस्तूच जागतिकीकरणे बनविल्याचे चित्रण आले आहे.जागतिकीकरणाने साहित्यातील प्रत्येक प्रकारावर आपला जणू ठसाच उमटविल्याचे दिसून येते. आज जागतिकीकरणामूळे मानवी मूल्ये ही पायदळी तूडवली जात असल्याचा आरोप काही साहित्यातून व्यक्त होतो तर जागतिकीकरणामूळे आपल्या भाषेवर घाला झाला असा सूर निघतो तर जागतिकीकरणाने आपल्या संस्कृतीचा ऱ्हास होतो आहे बसे सुद्धा चित्र मांडले आहे. जागतिकीकरणाचे इष्ट आनिष्ट जे ही परिणाम असतील ते वास्तव नजरेआड करता येत नाही.पण वास्तव परिस्थितीत साहित्यी कांनी मात्र आपल्या लेखनी व्दारे व आपल्या साहित्या व्दारे समाजाला जेजे इष्ट ते देण्याचा सतत पयत्न करावा जेणे करुन जागतिकीकरणात साहित्य टिकाव धरेल व या साहित्याच्या विश्वासावरच समाज टिकेल हिच अपेक्षा !

**संदर्भ :-**

१) रंगनाथ पठारे, जागतिकीकरण आणि देशीवाद लोकवाडमय प्रकाशनगृह, मुंबई पुनर्मुद्रण २००३ पृ.क्र. ९)
२) मधुकर मोकांशी ,जागतिकीकरणात मराठी पाऊल, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे पृ.क्र = १२४
३) प्रा. नागनाथ कोत्तापल्ले प्रा. दत्ताभगत,जागतिकीकरणानंतरचे मराठी साहित्य प्रा. प्रल्हाद लूलेकर गौरव ग्रंथ संपादकीय पृ.क्र. १६
४) डॉ. रवींद्रशोभणे, जागतिकीकरण समाज आणि मराठी साहित्य,' विजय प्रकाशन, प्रस्तावना पृ.क्र . १२
५) प्रा. डॉ गोपालगुरु जागतिकीकरण आणि अस्मितांचा प्रश्न यांचा जागतिकीकरणाचे अरिष्टे मधील लेख पृ.क्र. ६६
६) भालचंद्र नेमाडे, साहित्य, संस्कृती आणि जागतिकीकरण पृ.क्र. ४
७) प्रा. नागनाथ कोत्तापल्ले, जागतिकीकरणाचे नंतरचे मराठी साहित्य, प्रा प्रल्हाद लूलेकर गौरव ग्रंथ संपादीकीय पृ.क्र. १८
८) डॉ. रविंद्र शोभणे, जागतिकीकरण समाज आणि मराठी साहित्य मलपृष्ट